# भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे

**स्वप्न अर्थपूर्ण करणारी बँक**

'निवेदिता भवन', सीटीएस नं. ३४/७, फायनल प्लॉट नं. ३५/७ बी,
प्रभात रोड, लेन नं. ८, एरंडवणा, पुणे- ४११००४
Website : www.bhaginiiniveditabank.com ■ Email : ho@bhaginiiniveditabank.com
फोन नं. : ०२०-२५४४७६२०, ०२०-२५४४७६२१

संस्थापक
कै. सीए विवेक गणेश दाढे

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
(फक्त सभासदांकरिता)

भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे या बँकेच्या सर्व सभासद बंधू-भगिनींना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, बँकेची एकोणपन्नासावी वार्षिक सर्वसाधारण सभा **शुक्रवार, दि. २४/०९/२०२१ रोजी दुपारी ठीक २.०० वाजता,** महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दि. ३०/०७/२०२१ रोजीच्या आदेशानुसार Video conferencing/OAVM व्दारे **ऑनलाईन पद्धतीने** आयोजित करण्यात आलेली आहे. बँकेचे नोंदणीकृत कार्यालय 'निवेदिता भवन' सीटीएस नं. ३४/७, फायनल प्लॉट नं. ३५/७ बी, प्रभात रोड, लेन नं. ८, एरंडवणा, पुणे- ४११००४ हे सभास्थान मानण्यात येईल. तरी सभेस सभासदांनी ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहावे, ही विनंती.

**सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

### सभेपुढील विषय

१) दि. १७/०३/२०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) बँकेच्या आर्थिक वर्ष २०२०-२०२१ च्या कार्याबद्दलच्या अहवालाची माहिती घेणे व स्वीकृत करणे. तसेच बँकेचे दूरगामी धोरण व वार्षिक ध्येयधोरण यास मान्यता देणे.
३) दि. ३१/०३/२०२१ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाचा विचार करणे व स्वीकृत करणे.
४) आर्थिक वर्ष २०२०-२०२१ च्या वैधानिक लेखा परीक्षण अहवालावर व आर्थिक वर्ष २०१९-२०२० च्या वैधानिक लेखा परीक्षण दोषदुरुस्ती अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
५) मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशींनुसार आर्थिक वर्ष २०२०-२०२१ च्या नफा वाटणीस मान्यता देणे तसेच लाभांश जाहीर करणे.
६) मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या आर्थिक वर्ष २०२१-२०२२ च्या उत्पन्न-खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे व मागील ३ वर्षांच्या प्रगतीची माहिती घेणे.
७) बँकेच्या मा. संचालकांना व त्यांचे नातेवाइकांना आर्थिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये दिलेल्या कर्जाची, महाराष्ट्र राज्य सहकार कायदा कलम ७५(२) नुसार माहिती घेणे.
८) मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार आर्थिक वर्ष २०२१-२०२२ साठी करावयाच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या नेमणुकीस मान्यता देणे. (रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे पाठविलेल्या प्रस्तावाच्या मंजुरीस अधिन राहून)
९) आर्थिक वर्ष २०२२-२०२३ साठी अंतर्गत लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्याचे व त्यांचा मेहनताना ठरविण्याबाबतचे अधिकार मा. संचालक मंडळास देण्याबाबत निर्णय घेणे.
१०) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या स्टाफिंग पॅटर्नला मान्यता देणे.
११) बँकेच्या सभासदांचे शिक्षण व प्रशिक्षण यांकरिता बँकेने केलेल्या प्रयत्नांची आणि पुढील वर्षाच्या योजनांची नोंद घेणे.
१२) वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार बुडीत व संशयित कर्जखात्यांची नावे बाकी वसुलीचा हक्क अबाधित ठेवून निर्लेखित करण्यास मान्यता देणे.
१३) मा. संचालक मंडळाने सूचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे. तसेच समितीची निवडणूक घेण्याबाबत व तिचे चालविणेची पद्धतीबाबत माहिती घेऊन नोंद घेणे. (प्रस्तावित पोटनियम दुरुस्तीच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे पाठविलेल्या प्रस्तावाच्या मंजुरीस अधिन राहून)
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणुकीबाबतच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणाऱ्या प्रस्तावाची माहिती घेऊन त्यास मान्यता देणे.
१५) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेतील अनुपस्थित सभासदांची रजा क्षमापित करणे.
१६) मा. अध्यक्षांच्या अनुज्ञेने ऐन वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाचे आज्ञेवरून
सही/-
**स्मिता देशपांडे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

दिनांक : १७/०८/२०२१
ठिकाण : पुणे

टीप :-
१) सभेपूर्वी सभेची Link सभासदांना पाठविण्यात येईल. सदर सभेची Link सभासदांसाठीच मर्यादित आहे.
२) सभासदांचे e-mail address व mobile number बँकेकडे रजिस्टर्ड असणे आवश्यक आहे. रजिस्टर्ड नसल्यास सभासदांनी दि. १७/०९/२०२१ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत शाखेत संपर्क करून त्वरित पूर्तता करून घ्यावी.
३) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच दिवशी, त्याच Link वर दुपारी २.३० वाजता घेण्यात येईल व अशा तहकूब झालेल्या सभेस गणपूर्तीचा नियम लागू होणार नाही. सभासदांनी सभेच्या नमूद वेळेच्या १५ मिनिटे आधी Link वर join व्हावे.
४) अहवालाची प्रत दि. १०/०९/२०२१ पासून बँकेच्या संकेतस्थळावर (Website) www.bhaginiiniveditabank.com तसेच नोंदणीकृत कार्यालय व बँकेच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध होईल.
५) वरील वार्षिक सर्वसाधारण सभेत होणाऱ्या विषयांसंबंधी काही सूचना करावयाच्या असल्यास किंवा प्रश्न विचारावयाचे असल्यास त्या सूचना किंवा प्रश्न बँकेच्या मुख्यकार्यालयात/शाखेत दि. १७/०९/२०२१ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत लेखी पाठवावेत.
६) ज्या सभासदांना सभेमध्ये काही मते मांडावयाची असल्यास, अशा सभासदांनी आगाऊ नोंदणी करणे गरजेचे आहे. यासाठी सभासदांनी बँकेला त्यांचे नाव, सभासद क्रमांक, मोबाईल नंबर बँकेच्या मुख्यकार्यालयात किंवा शाखेत दि. १७/०९/२०२१ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत कळविणे आवश्यक आहे. नोंदणी केलेल्या अशा सभासदांना सभेमध्ये मते मांडायची संधी मिळू शकेल. तथापि उपलब्ध वेळेनुसार, याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार संपूर्णपणे बँकेकडे राहतील.
७) काही अनपेक्षित परिस्थितीत उदा. तांत्रिक कारणांमुळे सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडित झाल्यास, तांत्रिक त्रुटींचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज पुढे सुरू केले जाईल, याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.

### सभासदांसाठी सूचना :-

१) सभासदांनी आपला पत्ता बदलला असल्यास नवीन पत्ता लेखी कळवावा.
२) ज्या सभासदांनी मागील लाभांशाची रक्कम नेली नसेल, त्यांनी ती त्वरित नेण्याची व्यवस्था करावी. अन्यथा तीन वर्षांनी ती रक्कम बँकेच्या रिझर्व्ह फंडात जमा केली जाते.
३) सर्व सभासदांना आवाहन करण्यात येते की, ज्या सभासदांकडे रु. ५००/-पेक्षा कमी रकमेचे शेअर्स आहेत त्यांनी किमान रु. ५००/-चे शेअर्स घ्यावेत.
४) कृपया आपल्या खात्याची KYC पूर्तता केल्याची खात्री करावी.
५) बँकेच्या पोटनियमांनुसार क्रियाशील सभासदत्व, सभासदांचा बँकेच्या व्यवहारातील सहभाग (ठेवी अथवा कर्जे) यावर ठरणार आहे. म्हणून आपण आपले जास्तीत जास्त आर्थिक व्यवहार बँकेमार्फत करावेत.
६) पोटनियम क्र. १८/४ नुसार संयुक्त भागधारकांचे बाबतीत प्रथम नाव असलेल्या भागधारकासच सभेच्या Link वर join होता येईल.